पंचसाधन

कार्तिक वद्य १३, सत्यविक्रम संवत् ३६ : वर्ष ३ पुष्प ७ : १७ नोव्हेंबर १९७९ मूल्य २ रुपये

धैर्याने असा

धैर्याने असा. आपणांस अद्याप फार मजल मारावयाची आहे.
ईश्वराचे कार्य आपणाकडून अपेक्षित आहे.
आपण ईश्वराचे सैनिक आहात.
आपणास महान् स्थित्यंतर घडवून आणावयाचे आहे.
कालावधी असेल. परिस्थिती प्रतिकूल दिसत असेल,
तरी पण शक्त्यनुसार आपणास कर्तव्यबुद्धीने कार्य केलेच पाहिजे.
ज्याचा तोच कार्य यशस्वी करून घेईल.
मागे कधीतरी ईश्वरीय कार्य अयशस्वी झाल्याचा ऐतिहासिक पुरावा आहे काय ?
प्रतिकूल परिस्थिती आपोआपच अनुकूल झाली.

परमसद्‌गुरु श्रीगजाननमहाराज

मिती मार्गशीर्ष शु॥ ११ शके १८६७ (१५ डिसेंबर १९५४)

यज्ञदानतपःकर्मस्वाध्यायाऽभ्यसनं चरेत् । पञ्चसाधनमार्गोऽयं सर्वलोकहिताय च ॥

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

पंचसाधन

अग्निउपासना

वर्ष ३ रे : पुष्प ७

कार्तिक वद्य १३, सत्यविक्रम संवत ३६.

(१७ नोव्हेंबर १९७९)

श्रीदत्तात्रेयांना अभिप्रेत असलेला मार्ग

गाणगापूर हे श्रीदत्तात्रेयांचे ठिकाण. त्या-ठिकाणचा भस्माचा डोंगर प्रसिद्ध आहे. श्रीदत्त-गुरू यांनी केलेल्या यज्ञांच्या भस्मातून हा डोंगर निर्माण झाल्याची कथा आहे. अर्थात श्रीदत्तात्रे-यांचा आणि यज्ञ-उपासनेचा एवढाच संबंध नाही. तो फार व्यापक आणि दृढतर आहे. किंबहुना अग्निउपासना चालवणाऱ्यांवर श्रीदत्तात्रेय कृपेचा वर्षाव करतात असा दाखला पाहावयास मिळू शकतो. श्रीदत्तात्रेयांच्या समवेत नित्य असणारे श्वान हे चारही वेदांचे प्रतीक असल्याचे प्रसि-द्धच आहे. अर्थातच त्या वेदांनी—

'यज्ञेन् यज्ञमयजन्त देवाः
तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।'

हा जो उद्‌घोष केला आणि सर्व विश्वाला सृष्टीच्या प्रारंभकाळीच सांगितले की यज्ञाने देवांनी यज्ञपुरुषाचे पूजन केले आणि हा अग्नि-उपासनात्मक धर्म पहिला होता. म्हणजेच अग्नि-उपासना हा मूलधर्म आहे. नित्याच्या जीवनाला लागणारी पोषक शक्ती, मनोबळ आणि बौद्धिक बैठक ज्यातून मिळते, तो हा मूलधर्म, हाच त्याचा व्यापक अर्थ आहे.

जो मूलधर्म म्हणजेच पायाभूत भाग आहे, तो अर्थातच सर्व देवदैवतांच्या उपासनांचा भाग असू शकतो म्हणूनच मग

'अग्निमुखाः वै देवाः ।'

देव हे अग्निमुख आहे, असे म्हटले जाते. तरी-सुद्धा श्रीदत्तगुरूंचा अग्निउपासनेशी कसा निकटचा संबंध आहे, किंबहुना अग्निउपासना करण्यातूनच श्रीदत्तात्रेयांची आराधना कशी सिद्ध होऊ शकते, हा विषय पाहण्यासारखा आहे.

श्रीवासुदेवानन्दसरस्वती टेम्बेस्वामीमहाराज यांच्या दत्तमाहात्म्यात यावर प्रकाश टाकलेला पाहता येतो. हा उल्लेख एवढा विस्तृत आणि स्पष्ट आहे की त्यावर आणखी वेगळे भाष्य करण्याची वास्तविक आवश्यकता उरत नाही. या दत्तमाहात्म्यातील नवव्या अध्यायात—

सह्याद्रिनिकट मातापूर
तेथे वसे द्विजवर ।
विष्णुदत्तशर्मा पवित्र
कर्मशूर गृहस्थ ॥ ९.२८.

अशा ओवीने विष्णुदत्तशर्मा या मातापूर म्हणजे माहूर येथे राहणाऱ्या गृहस्थांची हकीगत सुरू होते. हे गृहस्थ कर्मशूर होते. कर्मशूर म्हणजे केव्हा, काय कृती करावी याचे यथायोग्य ज्ञान असलेले. त्यापुढे म्हटले आहे, :—

तो विप्र दत्तोपासक
असे कर्मठ मीमांसक ।
यथाकाली आन्हिक
करी विवेकपूर्वक तो ॥ ९.३०

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

हा विष्णुदत्तशर्मा श्रीदत्तात्रेयांची उपासना करी. तो कर्मठ होता, याचाच अर्थ अत्यंत काटेकोरपणे धर्मपालन करणारा होतो. कर्मामध्ये अत्यंत रति घेणारा अशा अर्थाने कर्मठ शब्द वापरलेला पाहता येतो. आपल्या हाती जे कर्म असेल, आपले जे कर्तव्य असेल, त्यावर निष्ठापूर्वक प्रेम ठेवणे आणि अत्यंत मन लावून ते करणे या अर्थाने खरोखरी या शब्दाकडे पाहायला हवे. त्याच्यानंतर तो मीमांसक होता, असेही पाहावयाला मिळते. मीमांसक या शब्दाच्या मूळ अर्थाकडे पाहताच अर्थातच आपल्याला 'श्रौतकर्म अत्यंत बिनचूक करणारा,' असा तो मीमांसक असे दिसते. 'श्रौतकर्म' यात पहिला भाग 'श्रौत' म्हणजे 'वेदांनी सांगितलेले,' 'वेदांनी प्रतिपादन केलेले,' किंवा 'वेदांना अभिप्रेत असलेले' असा आहे. तो श्रौतकर्म निष्ठेने करी असा त्या 'कर्मठ-मीमांसक' याचा अभिप्राय आहे. वेदांनी अर्थातच अग्निउपासना हा मूलधर्म असल्याचा उद्घोष केला आहे. वेद हे अग्निउपासनेची गाथाच आहेत. थोडक्यात तो दत्तोपासक होता याचे स्पष्टीकरणच वरील ओवीतील दुसरी ओळ करते. 'तो वेदांनी सांगितलेल्या आचारधर्माचे मनःपूर्वक आणि निष्ठापूर्वक पालन करीत होता,' हाच त्यातला आशय आहे. त्यापुढची तिसरी ओळ 'यथाकाळी आन्हिक' असे सांगते. 'योग्य वेळेला' उपासनेत महत्त्व असते. उदाहरणार्थ अग्निहोत्र हे सायं-प्रातर् बरोबर सूर्यास्त–सूर्योदयाला केले जाते.

दत्तमाहात्म्यातील या अध्यायात पुढील जो कथाभाग आहे, तो शक्यतो मुळात वाचण्यासारखा आहे. त्याचा सारांश असा आहे की 'त्याच्या दारात एक अश्वत्थ वृक्ष असतो. त्यावर एक ब्रह्मराक्षस राहत असतो. विष्णुदत्तशर्माकडून नित्य मिळणाऱ्या भूतबळीमुळे तो शांत व संतुष्ट होतो. तो मग विष्णुदत्तशर्मास तुला हवे ते मजकडून मागून घे असे सांगतो. आपल्या पत्नीशी विचारविनिमय करून तो त्या ब्रह्मराक्षसाला श्रीदत्तगुरूंची भेट करवून दे म्हणून मागतो. त्याप्रमाणे तो कोठे भेट होऊ शकेल हे सांगतो. दोनवेळेला श्रीदत्तगुरु समोर येऊनही विष्णुदत्तशर्मास त्यांची ओळख पटत नाही. अखेर तिसऱ्यांदा त्यांची भेट कोठे होईल, हे तो ब्रह्मराक्षस सांगतो.

त्याचप्रमाणे 'त्यांना दर्शश्राद्धास (अमावस्येस केली जाणारी इष्टियज्ञ आणि त्याला धरून केला जाणारा श्रद्धाविधी) भोजनासाठी येण्यास आमंत्रण दे' असे सुचवितो.'

त्याप्रमाणे श्रीदत्तगुरूंची स्मशानात भेट होते. त्याठिकाणी प्रथम दिसलेले श्वान, कावळे आणि स्मशान नि त्यात वावरणारे श्रीदत्तगुरू यांचे त्याला यथार्थ दर्शन होते. त्याबद्दल म्हटले आहे:

हासोनि ॐ तथा म्हणे दत्त
निजस्वरूप दाखविता
कुत्रे होती श्रुति मूर्तिमंत
वायस होत शास्त्रे ती ॥ ९·८४
योगभूमि दिसे स्मशान
पाहता चकित झाला ब्राह्मण॥९·८५

म्हणजे याहीठिकाणी असे म्हटले आहे की दत्तात्रेय योगभूमीत नांदतात आणि त्यांच्या बरोबर नित्य श्रुति–शास्त्रे असतात. नित्य श्रुतीं समवेत असणाऱ्या श्रीदत्तात्रेयांना अर्थातच श्रुतींनी–वेदांनी सांगितलेला आचारधर्मच अभिप्रेत असल्याचा त्याचा भावार्थ आणखी पाहता येतो.

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

या कथाभागात पुढे म्हटले आहे की श्रीदत्त गुरू भोजनाचे आमंत्रण स्वीकारतात आणि एक अट मात्र घालतात. 'माझ्या योग्यतेच्या दुसऱ्याला भोजनाला बोलाव. ते शक्य असेल तरच मी येईन, अशी त्यांची अट असते. मग विष्णुदत्त शर्मा सूर्यास पाचारण करतो. तो भोजनास येतो. परंतु भोजनास दोन ऐवजी एकूण तीन जण हवेत, असे श्रीदत्तगुरु सांगतात. तेव्हा अर्थातच विष्णुदत्तशर्मा यांची पत्नी श्रीदत्तगुरु आणि सूर्य यांच्याच योग्यतेचा म्हणून अग्नि नारायणास बोलवते. तो प्रसंग असा वर्णन केला आहे:

अग्निशाळेत जाऊन
प्रार्थी सती हात जोडून ।
अग्ने तू गृहपति म्हणून
प्रख्यात होसी कर्माध्यक्ष ॥ ९.९६

तुला असो गृहाची लाज
तू होवोनी द्विज ।
श्राद्धी क्षण घेई आज
योगीराज वाट पाही ॥ ९.९७

यातील प्रार्थना अर्थातच एक महत्त्वपूर्ण भाग सूचित करते. विष्णुदत्त शर्मा हा नित्य अग्निहोत्र करणारा होता. प्रारंभी जो 'कर्मठ मीमांसक' असा उल्लेख आहे. त्याचे हे अर्थातच स्पष्टीकरण आहे. श्रीदत्तगुरू त्याच्याकडे भोजनास येतात, कारण तो नित्य अग्निउपासना करणारा होता. अन्यथा त्याच्या पत्नीने श्रीदत्तगुरूंच्या योग्यतेचा म्हणून अग्नीस बोलावलेच कसे असते ?

नित्य अग्निउपासनेची ही महती आणि त्याचबरोबर गृहस्थाने करावयाची ती एक महत्त्वपूर्ण उपासना असे या अध्यायातील कथेचे -तात्पर्य म्हणता येईल. तेच 'मर्म' म्हणून या अध्यायाचा समारोप केलेला पाहता येतो:–

'करिता मीमांसोक्त कर्म
विप्रा मिळाले अलभ्य शर्म ।
शास्त्राचे जो जाणील वर्म
सर्व धर्म फळ घे तो ॥ ९ १०८

म्हणजेच श्रुतींनी सांगितलेले नित्य आचार पाळणारा विष्णुदत्तशर्मा असल्याने त्याला त्याचे फळ मिळाले, श्रीदत्तात्रेयांनी त्याच्यावर कृपेचा वर्षाव केला! शास्त्राचे जो 'वर्म' जाणतो, त्यालाच सत्यधर्माचे फल मिळते! शास्त्राचे वर्म अर्थातच 'नित्य अग्निउपासना' हेच असल्याचा उल्लेख प्रारंभी आलाच आहे.

श्रीदत्तात्रेयांबरोबर नित्य चारी वेद असतात हीच जर बैठक आहे, तर त्यातील अग्निउपासनेचे मर्म लक्षात घ्यावेच लागेल. शिवाय ती उपासना सोपी, सुलभ असता, तिला पर्याय असू शकत नाही, हेही पाहता येईल. अर्थात श्रीदत्तमाहात्म्याचा आणखी मागोवा घ्यायचा तर असे पाहत येईल की :–

आपल्याला चोवीस गुरूंपासून जे ज्ञान मिळाले ते सांगताना श्रीदत्तात्रेय आपले पाचवे गुरु प्रत्यक्ष अग्निनारायण असल्याचे सांगतात. त्याचे वैशिष्टय सांगता श्रीदत्तगुरु म्हणतात,

'कुंडात अग्नीस ठेवून
काष्ठाने प्रदीप्त करून ।
अग्निहोत्री करिती हवन
तया पावन करी तो ॥ ४८. ३१

'नित्य अग्निउपासना करणाऱ्यास अग्नि पावन करतो' हा याचा भावार्थ आहे. पावन

(पान ७ पाहा)

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

श्रीस्वामीसमर्थांचा संदेश

श्री. बाबूरावजी पारखे

श्रीस्वामीसमर्थ, अक्कलकोट, यांनी अवतार समाप्तीचा विचार निश्चित केला आणि त्याची कल्पना जवळपासच्या भाविकांना यावी यासाठी कांही सूचक चिन्हे दाखवू लागले व काही सूचक कृति करू लागले. श्रीबाळप्पामहाराजांना तर अगदी एक वर्ष आधी ते स्पष्टच म्हणाले, "आम्हाला फार उंच जावयाचे आहे, फार लांब जावयाचे आहे, माझी नौकरी करण्यास येतोस की नाही?"

'श्रीअक्कलकोट निवासी स्वामीमहाराज यांचे चरित्र' या अधिकृत मानल्या जाणाऱ्या चरित्राचे लेखक रा. स. मुळेकर यांना असे वाटले की श्रीबाळप्पामहाराजांना समर्थांच्या बोलण्याचा अर्थ त्या वेळेस कळला नाही. अर्थात सत्पुरुषांच्या वाक्यामागील जसा आशय चरित्र लेखकाच्या ध्यानात येत असतो तसाच त्याने तो मांडलेला असतो. 'मी तुला आपल्यासारखे करीन', 'माझा शिक्का यावच्चंद्रदिवाकरौ चालव', 'मी शरीराने अंतर्धान पावलो तरी तुझ्या द्वारा मीच कार्य करणार आहे,' ही कृपा ज्यांच्यावर स्वामी समर्थांची होती, त्या श्रीबाळाप्पामहाराजांनी इतरेजनांना आपले अंतरीचे भाव कळू दिले नसावेत. बाकी कोणालाही सहज लक्षात येईल असेच श्रीसमर्थ बोललेले आहेत. 'फार उंच जावयाचे आहे, फार लांब जावयाचे आहे,' याचा सहज बोध होण्यासारखाच आहे.

या पार्श्वभूमीवर, महानिर्याणाचे थोडे दिवसच आधी श्रीस्वामीसमर्थांनी एक होम केलेला आहे. वर उल्लेखिलेल्या चरित्रात त्याचा तपशील असा आहे.

"सलगराहून महाराज अक्कलकोटास आले. संताचा मठ म्हणून अक्कलकोटात (एक) स्थान आहे. त्याठिकाणी एका लिंगाईत साधूची समाधी आहे. समर्थांचे मठापासून जवळच ही समाधी आहे. त्या मठात महाराज जाऊन समाधीपुढे पलंग टाकून निजले. त्या वेळेस ठाकूरदासबाबा तेथे होते. त्यांनी समर्थांपुढे तिसरे प्रहरी कीर्तन केले व बावडेकर पुराणिकबोवाही महाराजांसन्निध होते. त्यांना महाराजांनी दोन चार टोपल्या गोवऱ्या आणण्याविषयी आज्ञा केली. पुराणिकबोवा एक टोपलीभर गोवऱ्या घेऊन आले. 'आपणास होम करावयाचा आहे, आणखी दोन तीन टोपल्या घेऊन या,' असे महाराज त्यांस म्हणाले. मग आणखी गोवऱ्या आणिल्या. समाधीवर एक महादेवाची पिंड होती. तिजवर सेवेकऱ्यांकडून महाराजांनी सर्व गोवऱ्या रचविल्या, व तूप आणण्याविषयी महाराजांनी आज्ञा केली. सेवेकऱ्यांनी एक मणभर तूप आणिले. खारीक, नारळ, सुपारी वगैरे जे जे पदार्थ महाराजांपुढे कोणी ठेविले ते सर्व ह्या गोवऱ्यांवर महाराजांनी टाकविले व आणविलेले तूपही ह्या गोवऱ्यांवर टाकवून, त्या चितेस संध्याकाळी अग्नि लावून दिला. सर्व दिवसभर महाराज त्या दिवशी निश्चक्र उपाशी होते. आपल्या गुरूची समाधी जाळतात हे ऐकून त्या साधूची सुमारे पंचवीस मंडळी...... गोवऱ्या वगैरे उडवून द्याव्या ह्या हेतूने तेथे आली. पण....महाराजांचे मुखाकडे पाहताच तोंडातून एक शब्दही न काढिता चित्राप्रमाणे ते चिप राहिले. चिता पुष्कळ वेळ जळत

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

होती, उजाडल्यावर राख काढून पिंडी धुवून साफ करण्याविषयी महाराजांनी भुजंगास आज्ञा केली. त्याने तसे केले, तो पूर्वी पेक्षा दैदिप्यमान् तेजाची पिंडी दिसू लागली...... ती पिंडी पूर्वीपेक्षा अधिक तेजःपुंज बनली. "

श्री. मुळेकर यांनी जनमानसात ताज्या स्मृति असताना परिश्रमपूर्वक माहिती गोळा करून ती संकलित केली हे खरे आहे. अर्थात या पूर्वी म्हटल्याप्रमाणे त्यांना जसे आकलन झाले तसे त्यांनी वर्णन केलेले आहे हेही तितकेच खरे. याच घटनेविषयी श्री. वि. के. फडके यांनी लिहिलेल्या स्वामीमहाराजांचे चरित्रात जरा अधिक अधिकृत खुलासा आहेः

" श्रीस्वामी समर्थांच्या महानिर्याणाची हकीकत पुणे येथील श्री. दत्तात्रेय काशीनाथ मोडक यांचे कडील जुन्या कागद पत्रात वाचावयास मिळाली. सदर हकीकतीचा कागद...जीर्ण असून त्यावर इ. स. १८७८ चा ' वॉटर मार्क ' आहे. म्हणजे समर्थांच्या निर्याणाच्या वेळीच किंवा त्यानंतर थोड्या फार दिवसांनी ही हकीकत लिहिली गेली असली पाहिजे हे उघड आहे. बहुतेक मजकूर सारखाच असला तरी काही त्या घटनेमागील रहस्यांच्या दृष्टीने अधिक स्पष्ट आहे.

" चांगली चिता पेटविल्यावर त्या चितेत शेकडो नारळ व अदमासे पक्के पाच शेर तूप व साखर पक्के पाच शेर, गहू तांदूळ, फळे, माळा, फुले वगैरे सुपारी खेरीज करून जे जे पदार्थ तेथे होते ते सर्व त्या चितेत टाकीत गेले. त्यावेळेस स्वामीमहाराजांस लोकांनी विचारले की, हे काय करितां? तेव्हा उत्तर केले की, ' लिंग देहाचा म्हणजे लिंगाचा यज्ञ करतो ' असे म्हणाले. "

'आपणास होम करावयाचा आहे' असे श्रीस्वामी समर्थांच्या तोंडचे म्हणून वाक्य उधृत करून त्या चितेस संध्याकाळी अग्नि दिला हा उल्लेख मुळेकर करतात.

श्री. मोडकही म्हणतात की श्रीसमर्थ चिता रचतात त्याप्रमाणे गोवऱ्या रचून ती चिता अग्नि लावून पेटवून देतात. चिता दुसरे दिवशी थंड झाल्यावर तेथे राखेचा मोठा ढीग पडला असे ही वर्णन करतात.

श्रीस्वामी समर्थांच्या महानिर्याणाचा प्रसंग वर्णन करताना महाराजांसारखी महाविभूती देहत्याग करीत असते. ते देह पतन नव्हे. दुश्चिन्हे देहपतनाबद्दलची असतात कारण मानवाची देहावरची आसक्ती गेलेली नसते.

देहाबद्दलच्या या मर्यादित दृष्टीमुळेच त्या उभयतांना व्यवहारी परिभाषेतला चिता हा शब्दच सुचला. लिंगाच्या तेजस्वितेची जी अनुभूति आली तिच्याकडे किंवा लिंग देहाचा यज्ञ करतो या समर्थांच्या सुस्पष्ट वाक्याकडे त्यांचे जावे तेवढे लक्ष गेले नसावे, ते यामुळेच म्हणावे लागेल.

एकादा चित्रकार आपल्या मर्यादित दृष्टीने जेव्हा महासमर्थ शक्तीचे वर्णन करण्याचा प्रयत्न करीत असतो तेव्हा त्याला वर्णन करीत असलेल्या घटनेचे नीट आकलन झालेले नसेल तर नवल नव्हे. 'आपणास होम करावयाचा आहे, हे वाक्य सुरवातीला असू शकते पण ' महाराज काय करता ', याचे उत्तर इतके लांब असणार नाही. एक शब्द बोलून भागणार असेल तर दुसरा शब्दही उच्चारला जाणार नाही, ही श्रीसमर्थांची नेहमीची बोलण्याची पद्धति पाहता, इतकेच काय कोणाही विभूतींची बोलण्याची

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

लकब लक्षात घेता 'होम करतो' एवढेच श्रीस्वामीमहाराज म्हणाले असावेत. श्री. मोडकांच्या कागदात लिंगदेहाचा म्हणजे लिंगाचा असा उल्लेख आहे. त्या ठिकाणीही 'म्हणजे' असण्याची शक्यता वाटत नाही. यावरून 'यज्ञ करतो, लिंगदेहाचा यज्ञ करतो, लिंगाचा यज्ञ करतो' असे श्रीस्वामीसमर्थ म्हणाले असले पाहिजेत असा कयास होऊ लागतो. गोवऱ्या रचून वेदी तयार करावयाला सांगितली पण तेथे असणारांना ते दृष्य चितेसारखे वाटले व चितेला अग्नि दिला असे त्याचे वर्णन त्यांनी केले. निर्याणाबद्दलची चिन्हे ही दुश्चिन्हे वाटावयाचे कारणच नाही. तसे ते व्यक्त करण्याच्या भरात जो उल्लेख झाला तो चितेचा झाला असाच त्या वर्णनाचा अर्थ करावयाला हवा. वस्तुतः तो यज्ञ आहे. कारण त्यात केवळ हवनीय द्रव्येच वापरली गेली आहेत. सुपाऱ्या वगळण्यास सांगण्यात आल्या कारण सुपारी हे हवनीय द्रव्य नव्हे. स्वामी समर्थ त्यादिवशी निश्चक्र उपाशी होते. याचा अर्थ यज्ञाचे निमित्ताने त्यांनी व्रतस्थ राहावयाचे ठरविले होते. अग्नि प्रज्वलित केला तोही संधिकालात आणि प्रदोषकाळी, याचा अर्थ अग्निमुखी हवनाचा प्रारंभ हा सायंकाळीच व्हावयाला हवा याचेही दिग्दर्शन येथे आहे.

ती पिंडी पूर्वीपेक्षा अधिक तेजःपुंज बनली किंवा पूर्वीपेक्षा दैदिप्यमान तेजाची बनली याचा अर्थ शुद्ध अग्निउपासनेचा दृष्य परिणाम त्यांनी सिद्ध करून दाखविला.

समर्थांनी तीन पद्धतीने उल्लेख केला यावर चिंतन सुरू केले की, प्रत्येकातील वैशिष्टच लक्षात येऊ लागते.

यज्ञ करतो यातील यज्ञ हा शब्द यज् धातूपासून झाला आहे आणि त्यातून 'देवपूजा संगतीकरण दानेषु' हे भाव व्यक्त होतात. देवपूजेत जे दिव्य आहे त्याचे आदराने पूजन, संगतीकरणात त्याच्याशी एकात्मता, दानात त्याच्या प्रीत्यर्थ त्याग किंवा अर्पण, भावयुक्त आहुति अभिप्रेत आहे. गोवऱ्या मागवून जेव्हा श्रीस्वामीसमर्थांनी यज्ञार्थ अग्नि प्रज्वलित केला तेव्हा त्यांना अग्निद्वारा लिंगातून व्यक्त होणाऱ्या पूजन करावे, त्याला केल्या जाणाऱ्या प्रार्थनेत एकात्मतेची तळमळ असावी आणि त्याप्रीत्यर्थ होणाऱ्या हवनीय द्रव्यांच्या आहुतीत अर्पणाची, शरणागत होण्याची भावना असावी हे सर्व विधियुक्त करवून घ्यावयाचे होते.

लिंग देहाचा यज्ञ करतो. यात यज्ञाची व्यापक बैठक आहे. देहाचा जीवाशी घनिष्ट संबंध आहे कारण जीवाच्या उत्पत्तीसाठी देहाची आवश्यकता असते. जीव जगतात येतो आणि जन्म-मरणाच्या फेऱ्यात अडकून जातो. सुखःदुख, पापपुण्य, या चक्रातून त्याची यात्रा चालू होते. या प्रदीर्घ यात्रेत परब्रह्मापासून अभिन्न असणारा जीव भिन्नवत् भासू लागतो आणि हे अज्ञान निघून जावे, जीवाने परत परब्रह्मात विलीन व्हावे यासाठी स्वामीसमर्थ लिंगदेहाचा यज्ञ करतो असे म्हणतात. पंच ज्ञानेंद्रिये, पंच कर्मेन्द्रिये, पंचप्राण, मन-बुद्धि-अहंकार यांच्या सूक्ष्म समन्वयाला लिंगदेह म्हणतात. अशा देहावर किंवा शरीरावर जाणून-बुजून किंवा अज्ञानतः, इच्छेने किंवा अनिच्छेने सहस्रावधि संस्कार होत असतात. त्यानेच चिरकाल टिकणारा संमोह निर्माण झालेला असतो. जोपर्यंत मोहभङ्ग होत नाही तोपर्यंत लिंगदेहाचेही पतन होत नाही. लिंग या शब्दाची

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

एक व्युत्पत्ति ' लयं गच्छति, इति लिङ्गम् ' अशी करतात. यासर्व संस्कारांचा देहातून लय व्हावा यासाठी यज्ञ करावयाचा हे समर्थांना सांगावयाचे असले पाहिजे.

लिंगाचा यज्ञ करतो हे विधान तर आणखी व्यापक आहे. याठिकाणी जंगमाच्या मठातील स्थूल शिवलिंग श्रींना अभिप्रेत आहे असे मला वाटते. लिंग हे प्रतीक आहे. मूल अग्नि उपासनेला अवैध स्वरूप आल्यावर प्रतिकात्मक पूजन जेव्हा सुरू झाले तेंव्हा अग्नीचे किंवा ज्योतीचे प्रतीक लिंगाने व्यक्त झाले. त्या प्रतिकाचा यज्ञ करण्यात त्या अंतस्थ ज्योतीवरील कवच दूर करावे हा उद्देश दिसतो. ज्याप्रमाणे राख बाजूला केल्यावर अनास्य अग्नीचे दर्शन घडते त्याप्रमाणे लिंगावर यज्ञ करून समर्थांनी ते तेजःपुंज कसे आहे– केवळ पार्थिव कसे नाही याचेच दर्शन घडविले असे म्हणावे लागेल.

आपण लवकरच पार्थिव देह विर्सजित करणार, भक्तांचे प्रेम आपल्या दृश्य शरीरावर राहणार आहे. आशवेळी लिंग देहाचाच यज्ञ करून देहालाच सर्वस्व मानू नका, ही शिकवण याठिकाणी असावी. मानवाने देहातिरिक्त सूक्ष्म तत्त्वाकडे जावयाला हवे आणि त्याचे साधन अग्निउपासना आहे हे श्रीस्वामीसमर्थमहाराजांना प्रत्यक्ष पटवून द्यावयाचे होते. सांगणे अप्रत्यक्ष असल्यानेच त्याचे निरनिराळे अर्थ लावले गेले. याशिवाय यज्ञ करून आगामी सत्ययुगाची सुचिन्हेही त्यांना दाखवून द्यावयाची असली पाहिजेत.

आपण लवकरच महानिर्याणाला निघणार असलो तरी ' डोंगर बोलू लागतील ' तेव्हा परत येऊ या आश्वासनात सत्यधर्माची पुनःस्थापना होणार आहे आणि आमचे परत प्राकटच त्या कालात होईल, ही आगामी कालाबद्दची भविष्यवाणीही आहे.

महाविभूति मानवकल्याणार्थ एकादी क्रिया करीत असतात त्याचा मानव आपल्या संकुचित बुद्धीने अर्थ लावीत असतो पण योग्य समय आल्यावर तीच विभूति त्यावर थोडाफार प्रकाश टाकीत असते. आमचे कार्य ' यावच्चंद्रदिवाकरौ चालवा ' हा श्रीबाळप्पामहाराजांना दिलेला आदेश श्रुतींच्या पुनरुज्जीवनाच्या संकलपाच्या पार्श्वभूमीवर आपण लक्षात घेतला तर समर्थांचे कार्य कोणते याचा थोडाफार बोध होतो. यासाठीच ती नौकरी करण्याचा आदेश त्यांना दिला गेला असे दिसते. नाहीतर शिवलिंगावरील यज्ञाची मीमांसा अन्य कशी करता येईल? तोच त्यांचा महानिर्याण प्रसंगाचा अखिल मानवाला कृतीने दाखविला गेलेला संदेश होय.

* * *

(पान ३ वरून)

करणे किंवा पवित्र करणे याचा अर्थ स्पष्ट आहे. नाना विचारांची आणि नाना प्रदुषणांची दडपणे मानव नित्य आपल्या मनावर बाळगीत असतो. त्यातून तो बेचैनी आणि अस्वस्थता यांचा शिकार होतो. नाना विचार त्याला नाना वाटांनी नेऊ पाहतात. उलट तो पावन झाला म्हणजे दडपणांपासून, भयापासून मुक्त झाला तर, त्याला त्याचा रस्ता स्पष्ट दिसतो. त्याच्या रस्त्यावर उजेडच उजेड असतो.

याच ठिकाणी पुढे श्रीदत्तगुरूंनी अग्नीचे वर्णन ' निराकार, कसलाही संग्रह न करणारा देवदेवतांना त्यांचा हविर्भाग पोचविणारा असे केले आहे. '

थोडक्यात नित्य अग्नि उपासना चालवण्याचे माहात्म्य अशा रीतीने याठिकाणी श्रीदत्तगुरूंनी स्वतःच स्पष्ट केले आहे आणि अशी उपासना चालविणाऱ्यावर कृपेचा वर्षावही केलेला आहे !

* * *

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

गोमय

– श्यामसुंदर गंधे

अग्निहोत्राचे आचरणकर्त्यांना गोवंशाच्यापासून मिळणाऱ्या सर्वच पदार्थांचे महत्त्व अनुभवाने समजून चुकलेले असते. त्यापैकी गोमय हे एक आहे.

ताजे गोमय जेथे पडलेले असेल, त्याठिकाणी त्याच्या नुसत्या वासाने तापाचे-मलेरियाचे जंतू नाहिसे होतात असे इटलीतील एक संशोधक प्रा. बीगेंड ह्यांना आढळले होते. गोमयातील तीव्र वासाच्या तेजाबसारख्या आम्लामुळे ते एक महत्त्वाचे रोगाणु-निरोधक बनते. दूध, तूप, मूत्र, दही आणि गोमय हे गाईपासून मिळणारे पदार्थ पंचगव्य नांवाने ओळखले जातात व हे सर्वच औषधी पदार्थ आहेत. चिकित्सेमध्ये ह्याचा नेहमी वापर केला जात असतो. गोमयापासून निघणारी विकरणे (Radiations) अत्यंत उपयुक्त असल्याने, अनुभवी माणसाच्या सल्ल्याने दुखावलेल्या भागासाठी पोटीस म्हणून वापर गोमयाचा करता येतो. गोमय हे दुर्गंधीनाशकही आहे. जाणकार रंगावरून व आकारावरून गोमयाची पारख करू शकतो.

प्राचीन कालापासून आरोग्य सदनांतून गोमयाचे लेपन करण्याची पद्धती भारत, इटली, जर्मनीसारख्या देशांतून आढळते. घरांतूनही जमिनीला, भिंतीला ठरावीक दिवसानंतर गोमयाने लेपन करण्याची पद्धती होती. ती आरोग्याच्या दृष्टीने उत्तमच होती. ती पुन्हा आता वापरांत येणे आवश्क आहे. कारण सध्याच्या सिमेंटच्या फरश्या व गिलाव्यामुळे वात-विकार कफ-विकार वाढतात, तसेच फरशांच्या सांध्यांमुळे पायास भेगा पडतात. ते टाळण्यासाठी वर दिल्याप्रमाणे लेपन करण्याची पद्धत उत्तम होय. गोमयाचे लेपन केलेल्या जमिनीवर उघड्या-अंगाने झोपले तरी अंग धरत नाही. सर्व गावात रोगाची साथ आली असतांना, गोमयाचे लेपन केलेले घर मात्र साथीच्या रोगापासून बचावले, अशी पंजाबमधील एका गावांतील हकीगत 'कल्याण' मासिकात एकदा प्रसिद्ध झाली आहे.

गोमयात कृमीनाशक शक्ति असल्याने चिकित्सा-ग्रंथात गोमयाचे व गोमयाच्या भस्माचेही उपयोग (अग्निहोत्र विभूतीचेही) सांगितलेले आढळतात. पोटाच्या विकारासाठी जसे अतीसार, हगवण इ. मध्ये ताजे गोमय स्वच्छ पाण्यात कालवून पिण्यास द्यावे असे सांगितलेले आहे. क्षयाचे रोग्याग गोठ्यात ठेवण्याची शिफारस केली जात असे. गाईचे श्वसनाचा तसेच गोमय–गोमूत्राच्या वासाचा उत्तम परिणाम त्याचा विकार नाहीसा करण्यासाठी होत असे. गोमय अंगास लावून उन्हात बसल्याने खाज-खुजली इत्यादींचा विकार नाहीसे होतात. मूल जन्मल्यानंतर त्याच्या ओल्या जखमेवर गोमयाच्या चूर्णाचे पोटीस बांधल्याने ते रोगाणुरहित रहाते व लवकर बरे होते.

डॉ. मॅकफर्सन ह्यांनी गोमयावर केलेले संशोधन अनेक वर्षांपूर्वी न्यूयॉर्क टाईम्समध्ये प्रसिद्ध झाले होते. उत्तम आहार असलेल्या व निरोगी गाईच्या गोमयासारखे दुसरे रोगाणुनाशक

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

नाही असे ते म्हणतात. गोमयाच्या ताज्या वासाने क्षयाचे, कॉलऱ्याचे जंतू नाहीसे होतात हे अनुक्रमे डॉ. मॅकफर्सन व मद्रासमध्ये पूर्वी असलेले डॉ. किंग यांनी अभ्यासाने मांडले होते.

गाईचे पोट हा व्हिटॅमिन्सचा एक कारखानाच आहे असे संशोधक म्हणतात. चार विभाग असणारे पोट ज्याचे असते असा गाईसारखा दुसरा प्राणी भूतलावर नाही. गोमयांत (तसेच गोमुत्रातही) मेंथॉल, अमोनिया, फिनॉल, इंडॉल आणि फॉर्मेलिन हे घटक तसेच नायट्रोजन (०.३२ टक्के) फॉस्फॅरिक ॲसिड (०.२१ टक्के) व पोटॅश (०.१६ टक्के)असतात, असे संशोधकांना आढळले.

गोमयाचे लेपन केलेल्या वस्तू अणुस्फोटानंतर निघालेल्या घातक विकरणांना रोधतात, त्याचप्रमाणे अवकाशयानामध्ये निर्माण होणारी प्रचंड उष्णता गोमयाचे लेपनाने कमी होते असे रशियन संशोधकांना दिसून आलेले आहे.

वातावरणशुद्धीसाठी आवश्यक असणारे गुण गोवंशाचे गोमयात प्रकर्षाने आढळतात. म्हणून गोमयाचा पूर्ण प्रज्वलित अग्नि अग्निहोत्रासाठी वापरण्यात येतो. गोमयांतील हे गुण नाहीसे होऊं नये म्हणून कापूर, गुग्गूळ गाईचे तुपांतील फुलवात वा विजेची शेगडी यांच्या सहाय्याने अग्नि तयार करावा असे सांगितले गेले आहे. अगदी अपरिहार्य असेलतरच गॅसच्या शेगडीवर धरून गोमयाच्या गोवऱ्या प्रज्वलित कराव्यात, प्रज्वलित अग्नीत सुद्धा निखारा व ज्वाला यामध्ये तपमानाचा फरक असतो. ज्वाला सुमारे ७०० अंश से. असून अग्निहोत्रासाठी (निखाऱ्यापेक्षां) उत्तम होय.

पेण येथे रहाणाऱ्या सौ. भिडे अग्निहोत्राच्या चौकशीसाठी मध्यंतरी घरी आल्या होत्या. त्या पेणला जेथे रहात असत, तेथे त्यांच्या घरांत विहीर असून नोकर पाणी काढत असे. एकदा विहिरीत एक नाग आढळला. अशा विहिरीतील पाणी प्यावे कसे? त्याना प्रश्न पडला. काही दिवस शेजार पाजारहून पाणी आणवून भागवले गेले. एकदां विहिरीतील कंगोऱ्यावर तो नाग मरून पडलेला नोकराला आढळला. तो बाहेर काढून टाकण्यात आला. पण तरी पाणी वापरण्यासंबंधी शंका मनांत राहिलीच. तेव्हा नोकर, "थांबा बाईसाहेब, मी त्याची व्यवस्था करतो" असे म्हणाला. रस्त्यावर जाऊन त्याने रस्त्यांत पडलेला गोमयाचा मोठा गोळा विहिरीत नेऊन टाकला.

दुसऱ्या दिवशी नोकर त्यांना म्हणाला, "आता हे पाणी वापरण्यास हरकत नाही." तरी सौ. भिडे व त्यांचे कुटूंबिय धजावेनात; शेवटी तो नोकर पुढे झाला व त्याने स्वतः त्या विहिरीतील पाणी सर्वांना पिऊन दाखवले, तेव्हा कोठे सर्वांच्या मनांतील शंका बरीचशी दूर झाली. नंतर त्यांनी ते पाणी वापरणे सुरू केले व पुढे बरेच दिवस(दुसरीकडे बदली होईपर्यंत) वापरलेही, परंतु त्याने घरांतील कोणालाही काहीही अपाय झाला नाही.

वरील हकीगत सौ. भिडे यांनी स्वतः सांगितलेली आहे. या हकीकतीचा देखील जाणत्यांनी गोमयाच्या संदर्भात सखोल अभ्यास करावयास हवा.

* * *

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

गोमय- एक औषधी पदार्थ

गाईच्या शेणाच्या संदर्भात नुकताच एक संस्कृत श्लोक पाहाण्यात आला. तो मूळ श्लोक असा आहे–

अग्रमग्रं चरन्तीनां औषधीनां रक्षं वने ।
तासां वृषभपत्नीनां पवित्रं कायशोधनम् ॥
यन्मे रोगाँश्च शोकाँश्च पापं ते हर गोमय ॥

स्नान करीत असताना अंगास गाईचे ताजे शेण लावून शरीराची शुद्धी व स्वच्छता करण्याची रीत आयुर्वेदाने सांगितली आहे. कित्येक खेड्यांमध्ये लोक अजूनही ताज्या शेणाने स्नान करताना दिसून येतात. आजच्या निसर्गोपचार चिकित्साप्रणालीतही गोमयाचा उपयोग दिसून येतोच. वर उधृत केलेला श्लोक प्रत्यक्ष गोमयाला उद्देशूनच म्हंटला आहे. स्नान करणारा पुरुष म्हणतो की ही गोमाता वनात चरत असताना अनेक औषधी-गुणधर्म असणाऱ्या वनस्पतींचा रस सेवन करते, त्यामुळे तिचे शेण सुद्धा शरीरास शुद्ध करते, पवित्र करते. त्याच्या उपयोगाने शरीरातील रोग, अशुद्धी यांचा नाश होतो. यावरून असे सहज लक्षांत येईल की गाईविषयी मनात पावित्र्य व प्रेम जपण्याचे जे बाळकडू दिले प्राचीन कालपासून दिले गेले त्याला वैज्ञानिक दृष्टीचा पाठिंबा आहे.

या दृष्टीने आयुर्वेदाने गाईच्या शेणाचे व त्याच्या भस्माचे जे गुणधर्म सांगितले आहेत ते अधिक अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. आयुर्वेदाच्या मते गाईचे ताजे शेण दुर्गंधनाशक, शोधक, सारक, शोषक, बीजवर्धक, पोषक, रसवान्, कांतिकारक व लेपन केल्यास स्निग्धता निर्माण करणारे व मलनाशक आहे. आयुर्वेदात असे सांगितले जाते की पोटातील मृत गर्भ बाहेर पडण्यासाठी गाईच्या शेणाचा ७ तोळे रस काढून तो गाईच्या दुधात दिला जावा. तसेच गुदभ्रंश झाला असल्यास गाईचे शेण गरम करून त्याने शेकावे. अंगास जर जास्त घाम येऊन, दुर्गंधी येत असल्यास गाईचे सुकलेले शेण व मिठाचे जुने मडके यांचे चूर्ण करून अंगाला लावावे. खरजेच्या ओल्या जखमा असतील तर त्या कोरड्या पडण्यासाठी शेण अंगास चोळून स्नान करण्याचा विधी आहे.

तसेच शेणाची राख शोषक, व्रणाला रोपण करणारी, रोचक, दुर्गंधिनाशक, धान्यवर्धक, कृमिकीटघ्न, शोधक व शीतनिवारक आहे. देवी येऊन त्या फुटून ओल्या जखमा झाल्या असता शेणाची राख वस्त्रगाळ करून जखमात भरत असत. साधारण प्रकारच्या त्वचेवरील जखमा बऱ्या होण्यासाठी ही राख तुपात कालवून लावली जाते. याशिवाय कोणत्याही धान्यास कीड लागू नये यासाठी धान्यात राख मिसळून ठेवण्याची पद्धत आहेच.

अग्निहोत्रातील अग्नि निर्माण करताना गाईच्या शेणाच्याच गोवऱ्या असाव्यात हा निर्बंध पाळणे किती महत्त्वाचे आहे हे यावरून समजू शकेल. अग्निहोत्रासाठी ज्या पदार्थांचा अग्नी निर्माण करावयाचा व ज्याचे नियमित ज्वलन करावयाचे तो पदार्थ किती औषधी गुणधर्माचा आहे हे ध्यानात घेणे आवश्यक आहे. – श्रीकांत

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

श्रुतींचे पुनरुज्जीवन–अखंड चाललेले परमेश्वरी कार्य (५)

बाबूरावजी पारखे

श्रीस्वामी समर्थांच्या कृपेने एक अधिकारी अवस्था ज्या घराण्याला लाभली, ज्या घराण्यांत उत्तरोत्तर अधिकारी विभूती जन्माला आल्या, त्याच घराण्यात शिवस्वरूप भाऊसाहेबांनी गायत्री पुरश्चरणाने व श्रीबाळप्पामहाराज यांच्या कृपेने जन्माला आलेल्या शक्तिरूपदेवी, हिरण्यवर्णा सोनामातांचा विवाह व्हावयाचा यामागला परमेश्वरी संकेत लक्षात घ्यावयाला हवा. कोणीकडे छत्तीसगड आणि कोणीकडे अक्कलकोट. पण ज्या दोन घराण्यांचे मीलन व्हावयाचे होते त्या दोन्ही घराण्यांवर श्रीस्वामी समर्थ आणि श्रीबाळप्पामहाराज यांचा अनुग्रह होणे हे काही अतर्क्य भावी घटनांसाठी असेल हे त्यावेळी कसे लक्षात येणार? श्रीगंगाधरमहाराजांना श्रीबाळप्पामहाराजांनी आपले निजांश म्हणून नियुक्त करून गादीचे अधिकार देणे याचा बोध त्यानंतर येऊ शकतो. या संत सत्पुरुषांच्या पारंपारिक संबंधात आणखीही एक संबंध यावयाचा होता. श्री उपासनीमहाराज यांचे कार्यक्षेत्र साकोरीस असतांना ते छत्तीसगड बंगाल या भागात पूर्वसंकेतानुरूपच होते हे नंतरच्या घटनावरून ध्यानात येते. उपासनी महाराजांचा शिर्डीच्या साईबाबांशी संबंध तर तात्याजीमहाराजांचा शिकन्दर साई शहाशी संबंध लक्षात घ्यावयाला हवा. असे असले तरी त्यांच्या कार्याचा प्रारंभ खरगपूर (खड्गपूर) पासून झाला असेच म्हणावे लागते. भाऊसाहेबांना त्यांचे सान्निध्य लाभावयाचे होते. सोनामाता त्या वेळी केवळ चौदा वर्षांच्या होत्या. इतक्या लहान वयांत परमेश्वरी कार्य व्यक्त व्हावयाचे होते असे उपासनी लीलामृतावरून दिसते.

एके दिवशी रावसाहेब विनायकराव (भाऊसाहेब शिगवेकर) यांची मुलगी सोनूताई ही महाराजांच्या दर्शनाला आली व इतर सर्व लोकही दर्शनाला येऊन लांब उभे राहिले. महाराज ठिकाणावर नाहीत असे पाहून सोनूबाई कोणत्या तरी भंग्याच्या घरी महाराज दळत असतील असे त्यांच्या नेहमीच्या वहिवाटीवरून समजून भंग्यांच्या चाळीत महाराजांना पाहात फिरू लागली.

एका घरात महाराज दळत बसले होते. सोनूबाई ते पाहून महाराजांना दळू लागण्यास येऊन बसू लागली.

महाराज : सोने, तू जात्याला हात लावू नकोस आणि येथे थांबू नकोस.

सोनूबाई : दर्शनासाठी लोक येऊन उभे राहिले आहेत. आता दळण पुरे करून चला.

महाराज : माझे दळण संपेपर्यंत मी काही येत नाही, थोडे राहिले आहे ते संपवून येतो. तू जा.

सोनूबाई : तर मग मी दळू लागते.

महाराज नको म्हणत असताही सोनूबाई बळेच बसून महाराजांच्या बरोबर दळू लागल्या व दळण संपल्यावर,

महाराज : सोने, जा आता तू.

सोनूबाई : तुम्ही चला.

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

महाराज : मी थोड्यावेळाने येतो. तू पुढे हो.

सोनूबाई : मी जात नाही.

महाराज : (अर्धवट रागावल्यासारखे होऊन) जात नाहीस तर काय तुला येथेच राहावयाचे आहे ?

सोनूबाई : (थोड्या धीट असल्याकारणाने) हो हो, मी इथेच राहीन.

महाराज : येथे काय भंग्याच्या घरात रहाणार ?

सोनूबाई : भंग्याच्या घरात कशाला, तुमच्या-जवळ राहीन. तुम्ही जेथे असाल तेथे राहीन,

महाराज : अग नको जास्ती बोलूस, निघून जा.

सोनूबाई : तुम्ही रागे भरा की काही करा, मी आज तर काही जात नाही. मी येथेच तुमच्या-जवळ राहणार.

शेवटी जेथे लोक उभे होते तिकडे महाराज निघून गेले. महाराज नेहमीप्रमाणे कुंड्याजवळ बसले. व सर्वजण दर्शन येऊन तेथेच बसले. महाराजांनी काही गोष्टी सांगून सर्वांना जा म्हणून सांगितल्यावर मंडळी गेली. सर्व जाताना सोनूबाईने आपल्या वडिलांस सांगितले की, मी आज महाराजांच्या जवळच राहणार. त्यांनीही राहण्यास परवानगी दिली. कुंड्या-जवळ पुष्कळ केरकचरा आणि राख पडली होती. त्या कचऱ्यात व राखेत महाराज लोळत पडले व रागावून म्हणाले,

महाराज : सोने, जातेस की नाही ?

सोनूबाई : तुम्ही रागावलेत तरी काय? निदान आज तरी मी जाणार नाही.

महाराज : मी राखेत, कचऱ्यात लोळत पडलो आणि तू कशासाठी इथे उभी राहिलीस ?

सोनुबाई लगेच त्या कचऱ्यात महाराजांच्या जवळ येऊन बसल्या. शेवटी ही जात नाही असे पाहून महाराज आपल्या ठिकाणावर व्हरांड्यात आले ... महाराजाचे जेवण झाले व सोनूबाईही तेथेच जेवल्या. त्या व्हरांड्यात एका बाजूला निजल्या. सकाळी उठल्यावर सोनुबाईना (रात्री) जो देखावा दिसला तो महाराजांस तिने सांगितला. तो असा –

एक मोठे अरण्य होते. त्या अरण्यात मैदान असून त्या मैदानात अतिशय मोठा प्रकाश होता. तो प्रकाश सूर्याचा किंवा चंद्राचा किंवा दिव्याचा नव्हता. तो कसा होता हे काही सांगता येत नाही, आणि त्या प्रकाशात मी होते तोवर एवढा आनंद होऊ लागला की त्या आनंदाचे वर्णन करता येणार नाही. जगापैकी कोणताच नव्हता. तो कसा होता हे काही सांगता येत नाही. त्या प्रकाशातून व त्या आनंदातून निघावेसे वाटतच नव्हते. त्यावेळेसे मला तुमची सारखी आठवण होत होती. आपण महाराजांच्या व्हरांड्यात असून येथे एवढ्या आनंदात कोणीकडे आलो ?.... त्या आनंदाचा अनुभव घेत घेतच मी जागी झाले.

जोपर्यंत सोनूबाई महाराजांचे जवळ होत्या तो पर्यंत निरनिराळ्या चमत्कारांचा अनुभव त्या घेत होत्या.

सच्चिदानंदस्वरुपी विलीन झालेल्या श्री. बाबांच्या सान्निध्यात सोनामातांना स्वप्न दृष्टांत व्हावयाचा होता. ही घटना १९१४ साली म्हणजे परमसद्‌गुरु श्रींच्या जन्माआधी चार वर्षे घडली आहे.

ज्या अनुभूति सोनामातांना आल्या त्यांचा अर्थ किंवा त्यामागील संकेत हा चिंतनाचा विषय झाला की त्याचे थोडेफार आकलन होते. या घटना केव्हा घडल्या, कोणत्या वातावरणात

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

घडल्या, कोणाच्या सान्निध्यात घडल्या यावर विचार केंद्रित केले की तो अर्थबोध सुरू होतो. परमेश्वरी शक्ति प्रादुर्भूत होत असताना अनेक प्रकारची पूर्व चिन्हे दिसून येत असतात. तसे संदर्भ सर्वत्र विखुरलेले आहेत. जगताच्या प्रारंभापासून त्याचा प्रत्यय आलेला आहे.

परमेश्वरी शक्तीचा प्रादुर्भाव होणार आहे हे ज्ञानी व्यक्तीच सांगू शकते. सोनामातांना आपल्या कन्येला महत्त्वपूर्ण गर्भसूचक स्वप्ने पडली हे भाऊसाहेबांना नक्की माहीत होते. तपश्चर्येने त्यांना त्याचे आकलन झाले असे मानावे लागेल किंवा श्रीउपासनीबाबांनी या रहस्याची उकल केली असावी असे तरी कबूल करावे लागेल. ज्याचा बीजरूपाने श्रीउपासनी-महाराजांचे चरित्रात उल्लेख आला आहे त्याचा नंतर सर्वांनाच अनुभव येत गेला.

सोनामातांचे ज्येष्ठ बंधु मामासाहेब शिंगवेकर एका पत्रात म्हणतात, ‘ आम्हा दोघां बहीण–भावंडात गप्पागोष्टी चालत व त्यात स्वप्नांचा उल्लेख होई. त्यातील उल्लेखनीय व स्मृतिधारणीय अशी काही स्वप्ने आठवतात. त्यातील एक आजही सांगावेसे वाटते. एका रात्री सोनाबाईला स्वप्नात अग्निज्वाला दिसल्या. त्यावरून ती चिता असावी असे तिला वाटले. तो अग्नि थंड होत गेला व त्यातून एक दिव्य पुरूष प्रादुर्भूत झाला. ’ स्वप्नांचा उल्लेख होई म्हणजे ती एकापेक्षा अधिक होती हे निश्चित. दोन तर आपण पाहिलीच. ती चौदा होती हीच ती रहस्याची उकल.

भगवान महावीरांची माता त्रिशला देवी. तिलाही अशीच चौदा स्वप्ने पडल्याचा ग्रंथांतरी उल्लेख मिळतो. ती अशी (१) हत्ती (२) वृषभ (३) सिंह (४) लक्ष्मी (५) पुष्पमाला (६) चंद्र (७) सूर्य (८) ध्वजा (९) कुंभ (१०) पद्मसरोवर (११) समुद्र (१२) विमान (१३) रत्नराशी (१४) निर्धूम अग्नि. ही स्वप्नाबद्दलची हकीकत ऐकून राज-ज्योतिषाने भविष्य वर्तविले की,

‘ महाराणीने पुण्यात्मा व्यक्तीच्या सान्निध्यात ही स्वप्ने पाहिली आहेत. त्यांच्या उदरातून एका महापुरुषाचा जन्म होणार आहे. ’

ही महावीरांच्या जन्माबद्दलची पार्श्वभूमी पहिली की उपासनीमहाराजांचे सान्निध्यातील अनुभूतीचा अर्थ स्पष्ट होतो.

निर्धूम अग्नीचे दर्शन–पवित्र अग्निउपासनेचे कार्य व्यक्त करतो. आपणालाही नित्य अग्नि-होत्रासाठी निर्धूम अग्नि घ्यावयाला हवा, या बद्दल कटाक्षाने बजावलेले आहे. सोनामातांना जो प्रकाश दिसला तो कशाचा हे सांगता येत नव्हते एवढा अवर्णनीय होता. म्हणजे ती एक दिव्य अनुभूति होती.

परमसद्गुरू श्रींचे पितामह तात्याजीमहाराज यांना जेव्हा नातवाच्या जन्माची मंगलवार्ता कळली तेव्हा त्यांनी नोंद करून ठेवली होती की “ यांना प्रव्रज्या योग आहे. ”

गौतम बुद्धांचा जन्म झाला तेव्हा हाच योग होता. तोच योग आपल्या नातवाचे वेळी आहे हे लिहून ठेवण्यात पुढील कार्याचे सूचक दर्श-नच त्यांना घडले होते असे नाही का म्हणता येणार ?

(क्रमशः)

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

जर्मनीतील 'पंचसाधन' चे कार्य

–प्रकाश पारखे

अलीकडेच व्यवसायाच्या निमित्ताने युरोपला जावयाचे ठरविले. काही महिन्यांपूर्वी जर्मनीहून श्री. वेर्नर मेट्झगर भारतात आले होते. पुणे, सातारा येथे त्यांची अग्निहोत्र विषयक "होमा थेरपी" या विषयावर काही व्याख्याने झाली होती. त्या व्याख्यानांनी जर्मनीतील कार्याविषयी माझे औत्सुक्य जागृत झाले होते.

युरोपच्या प्रवासात मी जर्मनीत व्यवसायासाठी जाणारच होतो तेव्हा बिटलब्रुन (Bittle brun) च्या दक्षिण जर्मनीतील मेट्झगरसाहेबांच्या गावाची मी चौकशी केली. हे गाव दक्षिण जर्मनीतील बोडेन्सी (Bodensea) च्या प्रसिद्ध सरोवराच्या उत्तरेस सिंगेन (Singen) या गावापासून १६ किलोमीटरवर आहे. बिटलब्रुन हे छोटेसे गांव, वस्ती साधारण तीनशेच्या आसपास. अत्यंत रम्य अशा वनश्रीने युक्त प्रदेशांत एका छोटया टेकडीवर वसले आहे. जवळूनच स्टुटगार्टकडे जाणारा मोठा हमरस्ता आहे. सभोवार प्रसिद्ध ब्लॅक फॉरेस्ट हा जर्मनीतील जंगलाचा भाग पसरलेला आहे.

याच भागात काही ज्वालामुखी शिखरे आहेत. या शिखरांवर इतिहास प्रसिद्ध किल्ले बांधलेले आहेत.

अशा या परिसरात सुमारे तीन वर्षांपासून श्री. व सौ. मेट्झगर यांनी Instutute Fur Angwndte Bioenergetik. Fvnffaltger Pfad. म्हणजे Institute of Applied Science of Bio-Energetics किंवा क्रियायोग शुले या नांवाने पंचसाधनमार्गाचा प्रसार सुरू केलेला आहे.

या संस्थेचे बोधचिन्ह सत्यधर्म–पंचसाधन मार्गाचे प्रतीक असून त्यात. एस (S) म्हणजे सत्य आणि (D) म्हणजे धर्म आणि त्याचे ज्याद्वारा पालन होते ते अग्निकुंड व सूर्योदय

सूर्यास्त यांचे महत्त्व दाखविणाऱ्या संधिकालांचे प्रतीक– अर्धसूर्यबिंब चित्रित केले आहे. संपूर्ण वर्तूळ हे धर्मचक्राचे प्रतीक आहे, तर सूर्याकडून अग्निकुंडाकडे येणाऱ्या पांच तेजोरेखा या पंचसाधनमार्गाच्या यज्ञ, दान, तप, कर्म आणि स्वाध्याय या पंचतत्त्वांच्या निदर्शक आहेत.

श्री मेट्झगर मला ही विविध माहिती देत होते व ऐकताना त्यांची याविषयाबद्दलची आत्मीयता, जिव्हाळा, श्रद्धा प्रतीत होत होती. यासंस्थेतर्फे जर्मन भाषेत पंचसाधन मार्गाचा संदेश सत्संग (Satsang) या पत्रिकेमार्फत सांगितला जातो.

सत्संग पत्रिकेचे साधारण अडीच हजार अंक जर्मनीभर विनामूल्य पाठविले जातात. अमेरि_

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri



अग्निउपासनेत तन्मय झालेली बालके

केतून इंग्रजी भाषेत प्रकाशित केल्या जाण्याऱ्या सत्संग पत्रिकेतील माहिती जर्मन भाषेत भाषांतरित केली जाते त्याचप्रमाणे जर्मनीतील व युरोपमधील अग्निहोत्राचे वृत्त त्यात दिले जाते. श्री मेट्झगरही कांही लेख लिहितात. दर महिन्या दोन महिन्यांनी सत्संग सभा भरतात त्यावेळी जर्मनीतील अग्निहोत्री मंडळी जमतात. यावेळी ' त्र्यंबकं यजामहे... ' या मंत्राने हवन केले जाते व जर्मनीतील कार्याविषयी चर्चाही केली जाते. येथून अग्निहोत्राची हवनीय द्रव्ये व अग्निहोत्रपात्रे मूल्य घेऊन पोस्टाने पाठविली जातात त्याचप्रमाणे इतरही ठिकाणी अशाचप्रकारे अग्निहोत्रासाठी आवश्यक असणाऱ्या साधनसामुग्रीची बिक्री व्यवस्था केलेली आहे.

श्री. मेट्झगर अशी माहिती सांगत होते. मीही त्यांना प्रश्न विचारत होतो.

ते नुकत्याच झालेल्या हायडलबर्ग येथील वैद्यकीय परिषदे विषयी सांगत होते.

त्या परिषदेमध्ये जर्मनीतील सुविख्यात वैद्यक विशारदांना Anxiety and depressions are the causes of changing of structure of tissue " आणि Stress and strains are the causes of diseases " या गोष्टीवर भर द्यावासा वाटला. थोडक्यात काळजी, निराशा, तणाव यांचा शरीरावर होणारा परिणाम आणि त्यातून रोगांना मिळणारे आमंत्रण हा त्यातला विषय होता.

साहजिकच मेट्झगरसाहेबांनी माझ्याजवळ

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

असे व्यक्त केले की, ' हा ताण, तणाव कमी होऊन सुख, समाधान मिळावे यासाठी अग्निहोत्र नको कां करावयाला. अग्निहोत्राने हा ताण कमी होतो व मानसिक शांतता मिळते हा अनेकांनी अनुभवलेला विषय आहे. आज जर्मनीसारख्या देशांत लौकिक अर्थाने सर्वप्रकारची आर्थिक संपन्नता आहे. तरीही वाढत्या औद्योगीकरणाने साऱ्याच माणसांच्या जीवनाला एक प्रकारचा प्रचंड वेग प्राप्त होतो. त्यातूनच ताणतणाव निर्माण होतात तेव्हा आर्थिक संपन्नतेने मानवी जीवनाचे सर्वच प्रश्न सोडविले जातात असे नव्हे. किंबहुना नवेच प्रश्न नित्य निर्माण होत आहेत. '

' ते पुढे म्हणाले, प्रदुषणाने होणारे शारीरिक परिणाम व त्यातून मनावर होणारे परिणाम वाढत आहेत. अशा स्थितीत मानसिक शांतता



वेर्नर मेट्झगर यांची अग्निशाळा

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri



क्रियायोग शूले

लाभावी, सुखी व्हावे ही प्रत्येकाचीच धडपड असते. आपले सुख व आपल्या प्रतिक्रिया आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींविषयी कशा होतात, यावर अवलंबून असते. आपल्या मनाला आपण कसे शिक्षण देतो यावर ते अवलंबून असते.

‘ यज्ञ, दान, तप, कर्म आणि स्वाध्याय या पंचसाधन मार्गाचे आचरणाने किंबहुना तीच जीवनपद्धती आहे असे आचरण व्हावयाला व्हावे. ’

श्री मेट्झगर अत्यंत तळमळीने या विषयावर बोलत होते.

त्यांच्याबरोबर तेथील अग्निमंदिर आणि अग्निहोत्रावर केलेली घरातील बाग व त्यांचा प्रकाशन विभाग पहिला.

श्री. व सौ. मेट्झगर यांच्यांप्रमाणेच त्यांच्या तीनही कन्या पंचसाधन मार्गाच्या आचरणाने प्रभावित होऊन गेल्याचा अनुभव आला. कांही महिन्यांपूर्वी श्री. व सौ. मेट्झगर आपल्या छोटया कन्येबरोबर भारतात आले असताना अग्निमंदिराची व्यवस्था त्यांच्या दोन कन्यांनी पाहिली. ते काम त्यांनी मोठ्या जबाबदारीने पार पाडले.

असाच संस्कार आजूबाजूच्या इतर बालकांवर व्हावा आणि त्यांनाही पंचसाधन मार्गाचा आनंद मिळावा यासाठी सौ. मेट्झगर या बालकांसाठी वर्ग (चिल्ड्रेन्स क्लासेस) चालवतात. या ठिकाणी दिलेल्या छायाचित्रात अशी छोटी मुले अग्निहोत्रासाठी जमलेली आणि त्यात तन्मय झालेली दिसत आहेतच.

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

आपल्या बागेत श्री. व सौ. मेट्झगर यांनी स्ट्राबेरी आणि इतर फळझाडे लावलेली आहेत. त्याचप्रमाणे घरात नित्य लागणारा भाजी-पालाही ते तेथे लावीत असतात. या साऱ्यांसाठी खते म्हणून ते गोमय आणि अग्निहोत्रभस्म यांचाच वापर करतात. बागेला अग्निहोत्र वातावरणाचा फायदा मिळावा म्हणून अग्निमंदिराची बागेकडील खिडकी अग्निहोत्राच्या वेळी उघडी ठेवलेली असते.

श्री. व सौ. मेट्झगर आणि त्यांच्या कन्या यांचा आणखी एक विशेष यावेळी माझ्या लक्षात आला तो असा की ते पूर्ण शाकाहारी आहेत, इतकेच नव्हे तर, घरातच त्यांनी छोटी पिठाची गिरणी (ग्राइंडर) बसवलेली असून तीवरच ते आपल्याला लागणारी पिठे दळतात. बाजारातील तयार पीठ ते आणीत नाहीत.

या संदर्भात बोलताना श्री. मेट्झगर म्हणाले, 'शाकाहारी असण्याचा आनंद मी व माझे कुटुंबीय घेत आहोतच. तो त्याप्रमाणे इतरांनीही घ्यावा, यासाठी त्या त्यांना मागची भूमिका विशद करून सांगतो, ज्यांना ती पटते ते हळूहळू आमच्याप्रमाणे शाकाहाराकडे वळतात देखील.'

बिटलब्रूनहून मी झुरिकला जावयाचे ठरविले. त्यावेळी श्री व सौ. मेट्झगर मला पोचविण्यासाठी निघाले. ते मला आपल्या कारमधून घेऊन झुरिकपर्यंत आले. यावेळी सायंकाळ झाली होती. सूर्य अस्तमानाकडे झुकला होता. तेव्हा झुरिकमधील हॉटेलात त्यांच्याबरोबर सायं-अग्निहोत्र करण्याचा योग आला !

अशा रीतीने जर्मनीमधील पंचसाधन मार्गाचे कार्य आणि त्याचा विस्तार, त्याचप्रमाणे ते कार्य तळमळीने चालवणारे श्री. मेट्झगर हे सारे पाहून अत्यंत आनंद वाटत होता. त्या आनंदातच त्यांचा निरोप घेतला आणि भारताकडे परतलो.

* * *

'पंचसाधन' ला आमचे हितचिंतन !

मे. शाह अ‍ॅण्ड जोशी लि.,

कागद विक्रेते,

८९ धनजी स्ट्रीट,

मुंबई – ४०० ००३.

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

वायुभक्षणाची अनुभूति

–सोमयाजी नाना अत्रे

अग्निउपासनेच्या वेळी ' जी हवनीय द्रव्ये अग्नीत समंत्रक अर्पण केली जातात, त्यातून वातावरणात पोषक द्रव्ये सोडली जातात, अशी वेदमंत्र ग्वाही देतात. ती शरीरपोषणाला कशी उपयुक्त आहेत यासंबंधीचा सोमयाजी नाना अत्रे यांचा थक्क करणार अनुभव

गल्या १२ एप्रिल १९७९ पासून अन्न सर्वस्वी वर्ज केले आहे. सोमयागाचे पूर्वी एक महिना यजमान व यजमानपत्नी यांना अन्न वर्ज करावेच लागते, त्याप्रमाणे १९७८ मध्ये आम्ही उभयता एक महिना चहा दूध, ताक यावरच होतो. फळे वगैरे घन पदार्थही वर्ज होते. त्यावेळीही अग्निनारायणाच्या कृपेने उभयतांनाही उपवासाचा कसलाच त्रास झाला नाही आणि अशक्तपणाही जाणवला नाही. सोमयाग दि. २२–५–७८ रोजी पूर्ण झाला व अन्नग्रहण सुरू केले त्याचवेळी अन्नग्रहण करावे अगर त्याची आवश्यकता आहे अशी भावनाच निर्माण होईना. म्हणून उपवास तसेच चालू ठेवण्याचा विचार होता. परंतु घरातील सर्व मंडळींनी त्यास विरोध केल्यामुळे २२–५–७८ पासून अन्नग्रहण सुरू केले.

माझे दीक्षागुरू साग्नचित् दादासाहेब आपटे (म्हापसे) हे त्यांच्या सोमयागाच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी एक महिना उपवास करतात. महाजनो गतःस पन्थाः । या न्यायाने त्यांच्याप्रमाणे आपणही उपवास करावा म्हणून १२ एप्रिल १९७९ पासून एक महिन्याकरिता पुन्हा अन्न वर्ज केले. १२ मे १९७९ रोजी सोमयागाचे स्मृति निमित्त अतिपवित्रेष्टी केली व त्याच दिवशी अन्नग्रहणास सुरुवात करायची होती. परंतु अन्नग्रहणाची इच्छाच होईना. उलट भरपूर भोजन केल्यावर जी तृप्ती येते व त्यामुळे अन्नाची एक प्रकारची वासना जाते तसा प्रकार घडला म्हणून अन्नग्रहण वर्जच केले. आज या या गोष्टीस सहा महिने झाले. अन्न न घेतल्या-मुळे येणारा थकवा अगर अशक्तपणा उत्पन्नच झाला नाही, सर्व शरीरधर्म व्यवस्थित चालू आहेत.

परवा पुण्यास गेल्यावेळी माझ्या एका मित्राने माझ्या उपासाची चेष्टा करण्यासाठी, "मग आता वायुभक्षणच कां !" असे उद्गार काढले त्यामुळे एक निराळीच विचारधारा सुरू झाली. पूर्वीचे ऋषीमुनी वायूचे भक्षण करून तपश्चर्या करीत असत, असे आपण पुराणांतरी वाचतो. त्याचा अनुभव मी प्रत्यक्षपण घेत होतो कां ? परंतु हे वायुभक्षण म्हणजे तरी काय ?

शरीराला अन्नभक्षणाद्वारा विशिष्ट कॅलरी मिळाल्याशिवाय शरीर चालणे शक्य नाही असे शरीरशास्त्र सांगते. त्या कॅलरी कशा मिळू शकतील हे आहार शास्त्र सांगते. या दोन्ही शास्त्रांना काटशह मिळालेला पाहून अचंबा वाटला. परंतु मग लगेच विचार आला

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

की शास्त्र खोटे ठरणे शक्य नाही. शरीरधर्म ज्या अर्थी व्यवस्थित चालू आहेत त्याअर्थी त्या शरीराच्या पुष्टीसाठी लागणाऱ्या विशिष्ट कॅलरी त्याला मिळत असल्याच पाहिजेत. मग त्या कशा मिळत असतील याचा विचार सुरू झाला.

त्याचे उत्तरही ताबडतोब मिळाले. नित्य सायं-प्रातर्होम व त्यापासून निर्माण होणारा विशुद्ध वायु यापासून शरीराचे पोषण होत असले पाहिजे. श्रौत अग्निहोत्राच्या सायं-प्रातर् होमामध्ये विधियुक्त अशा हवनीचे द्रव्यांचे हवन विशिष्ट मंत्रांच्या उच्चाराने करावे लागते. या हवनामुळे व मंत्राच्या उच्चारामुळे जी वायू निर्मिती होते, त्यापासून शरीराचे पोषण होत असले पाहिजे, हे उघड आहे. हे खरेखुरे वायुभक्षणच नव्हे काय ?

पण मग हे खरे मानले तर एक नवीनच समस्या पुढे उभी रहाते. 'वायुभक्षणच कां ?' असे विचारणारा माझा मित्र म्हणेल, "ठीक आहे. नुसत्या तुमच्या अग्निहोत्राच्या वायुभक्षणामुळे शरीर पोषण होत असेल तर आम्हीही तुमच्या सारखेच ओला पंचा नेसून तुमच्या अग्निशाळेत तुमच्या सायंप्रातर् होमाच्या वेळी येऊन बसतो व वायुभक्षण करतो. आमच्याही शरीराचे पोषण होऊ देत. अन्नासाठी दशदिशा फिरून नाना–कटकटी करण्यापेक्षा शरीर पोषणाचा तुमचा हा उपाय फार सोपा आहे."

समस्या तर खरी पण त्याची उकलही लगेच झाली. अग्निहोत्रामध्ये निर्माण होणाऱ्या वायुमध्ये शरीरपोषण करण्याची जी द्रव्ये अगर, जे घटक आहेत ते ग्रहण करण्याची क्षमता त्या शरीरात असली पाहिजे. तरच त्याचे फायदे मिळू शकतील. उदा० प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांपुढे कालिदासाच्या शाकुंतलावर संस्कृतमधून व्याख्यान सुरू केले तर त्याचा काय परिणाम होणार आहे ? ते व्याख्यान ग्रहण करण्याची त्या विद्यार्थ्यांची क्षमताच नाही. ४४० होल्टच्या विजेच्या दाबावर ४० वॅटचा दिवा लावला तर त्याचा काय परिणाम होणार ? फ्युज जाईल अगर दिवा जळेल. म्हणजे विशिष्ट शक्ती ग्रहण करावयाची असेल तर ती शक्ती ग्रहण करण्याची क्षमताही त्या वस्तूच्या ठिकाणी पाहिजे. अग्निहोत्रामुळे निर्माण होणाऱ्या वायुमधील शरीर पोषण द्रव्ये ग्रहण करण्याची क्षमता प्रत्येक मानवमात्राला निर्माण करता येईल. अर्थात त्यासाठी नित्य अग्निउपासना ठराविक बंधनाने करावयास पाहिजे.

ही एक व्यक्तिगत वैज्ञानिक अनुभूति म्हणून नमूद केली असली तरी त्याचे मूळ वेदमंत्रात आढळते. किंबहुना या वेदातील ऋचाच या अनुभूतीचाच पाया आहे. त्यापैकी श्रीसुक्तातील ही ऋचा पहा "गंधद्वारां दुराधर्षां नित्य पुष्टां करिषिणीम् ।" येथे गंध याचा अर्थ वायु असाच आहे. आणि त्यात वायुद्वारा नित्य पुष्टीचे आश्वासन आहे. परंतु आपण असे कर्मदरिद्री की, या ऋचेतील खरा अर्थ लक्षात न घेता केवळ 'गंध' या शब्दामुळे मूर्तीला गंध लावताना हा मंत्र आपण उपयोगात आणतो.

ही दुसरी ऋचा पहा–

"त्र्यंबकं यजामहे सुगंधिं पुष्टिवर्धनम्"

येथें 'यजामहे' या शब्दाने यज्ञाचा स्पष्ट उल्लेख आहे. आणि त्यापासून निर्माण होणाऱ्या सुगंधापासून पुष्टिवर्धनाची हमी आहे.

अग्निसंपर्कानेच लोखंडापासून लोहभस्म, अग्निसंपर्कानेच सुवर्णापासून सुवर्णभस्म, अग्निसंपर्कानेच मोत्यापासून मौक्तिकभस्म वगैरे

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

मौलिक औषधे तयार होतात. मग मंत्राने दिलेल्या आहुतीचे अग्निसंपर्काने पुष्टिकारक औषधीरूपी वायूत रूपांतर झाले तर नवल वाटावयास नको. ही निसर्गसिद्ध गोष्ट आहे. हेच खरे विज्ञान आहे आणि हेच वैज्ञानिक अनुभूतीचे खरे वायुभक्षण आहे.

या वैज्ञानिक बैठकीचा शोध न होता यज्ञातील पुष्टिवर्धन करणाऱ्या आहुति बद्दल 'जाळ-पोळ' 'अन्नधान्याची नासाडी' अशी ओरड केली जाते. परंतु ही ओरड करणारे विज्ञानातील पहिलाच सिद्धांत विसरतात. मला आमच्या वेळच्या इंग्रजी चौथी मध्ये (हल्लीची आठवी) (Nothing is lost when a candle burns) हा सिद्धात प्रथम शिकविला त्याचा शास्त्रशुद्ध प्रयोगही शिकविला. पण Nothing is lost when आहुति burns असे म्हटले तर ते मात्र खोटे म्हणावे. हा अशास्त्रीय दृष्टीकोन होय-त्यापासून फायदे लक्षात न घेणे हा त्या पलीकडचा अशास्त्रीयपणा कोणत्याही द्रव्याचे अग्नि संपर्कानंतर त्याचे रूपांतर कशात होते याचा शास्त्रशुद्ध अभ्यास केल्याशिवाय कोणतेही विधान करणे अर्थात हे अज्ञानच नव्हे काय ?

आहार शास्त्राच्या दृष्टीनेदेखील वैज्ञानिकांनी फक्त घन पदार्थ व द्रव पदार्थ यांचेच परीक्षण केले आहे. आहार शास्त्राने आहाराच्या दृष्टीने तिसऱ्या वायुरूप आहाराचा विचार केला नाही. आमच्या ऋषीमुनींनी पूर्वी केला होता. हल्लीच्या वैज्ञानिकांनी या तिसऱ्या वायुरुप अवस्थेचा विचार फक्त मानवाच्या विनाशासाठी हैड्रोजन, नैट्रोजन बाँब, या स्वरूपात केला.

प्रत्येक दर्शपौर्णमासाच्या वेळेस सुरुवातीलाच अग्नीच्या बरोबरच "अग्ने व्रतपते व्रतं चरिष्यामि तच्छकेयं तन्मे राध्यताम्।" या मंत्राबरोबरच "वायो व्रतपते ये व्रतं चरिष्यामि तच्छकेयं तन्मे राध्यताम्।" अशी वायूचीही प्रार्थना करावी लागते, ती या बैठकीला धरून.

* * *

'पंचसाधन' ला आमचे प्रणाम

मैं. प्रिमिअर पेपर कॉर्पोरेशन,

कागद विक्रेते,

१०५/ए चर्चगेट चेम्बर्स,

न्यू मरिन लाइन्स,

मुंबई – ४०० ०२०.

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

छोटयांसाठी :-

सत्पात्र

– श्रीकांत राजीमवाले

अडीच हजार वर्षांपूर्वीची गोष्ट. कोसल देशातील सुंदरिका नदीचा काठ. घनदाट नि हिरव्यागार वृक्षराजीने नटलेला. अशा रम्य ठिकाणी त्यावेळी तथागत भगवान गौतम बुद्धांचा निवास होता. नदीच्या काठावर एक छोटीशी पर्णकुटी उभारलेली होती. त्यात भगवान राहत होते. शांत, प्रशांत तीरावरील अशा त्या पर्णकुटीत ते असतानाच त्याच नदीच्या किनाऱ्यावर सुंदरिक भारद्वाज नावांचा एक सत्‌शील, तपस्वीही तपाचरण करीत कालक्रमणा करीत होता. विशेष सांगायचे म्हणजे अर्थातच तो अग्निउपासक होता, अग्नि उपासनेवर त्याची अत्यंत निष्ठा होती.

नित्य सायंकाळी सूर्यास्ताला आणि सकाळी सूर्योदयाला तो श्रद्धापूर्ण अंतःकरणाने अग्निहोत्राचे आचारण करून अग्नि-प्रजापति आणि सूर्य-प्रजापति या देवतांना-शक्तींना उद्देशून तो गोमयातून प्रज्वलित केलेल्या अग्नीत हविर्भाग अर्पण करीत असे. त्याचा एक आणखी नियम देखील होता. अग्निहोत्रासाठी आहुती दिल्यानंतर जो शेष हविर्भाग राहात असे, त्याचे तो एका सत्पात्र व्यक्तीला दान देत असे.

असाच एके दिवशी अग्निहोत्र आटोपल्यावर तो रस्त्यावर येऊन उभा राहिला. चारही दिशांकडे न्याहाळून पाहू लागला. सत्पात्र व्यक्ति कोणी येते आहे काय, दूर कोठे दिसते आहे काय, याचा तो तपास करीत होता.

तेवढ्यात त्याचे लक्ष दूर एका वृक्षाखाली डोक्यावरून वस्त्र घेऊन ध्यानस्थ बसलेल्या एका तेज:पुंज व्यक्तीकडे गेले. ते अर्थातच प्रत्यक्षच भगवान बुद्ध होते. ते आपल्या भावसमाधीत होते. परंतु सुंदरीकाला ते भगवान बुद्ध असल्याची जाणीव नव्हती.

सुंदरिक त्यांच्या रोखाने चालू लागला. आपल्याला हवी ती सत्पात्र व्यक्ती हीच, अशी त्याला मनोमन जाणीव होत होती. तरी देखील मनांत काहीएक शंका होतीच. सुंदरिकाच्या पावलांचा आवाज ऐकून भगवान बुद्धांनी आपले शांत, तेजस्वी नि प्रसन्न नेत्र उघडले. अत्यंत प्रेमार्द्र नजरेने त्यांनी सुंदरिकाकडे पाहिले.

इकडे सुंदरिकाच्या मनांत भगवानांच्या जवळ येताच शंकेचे काहूर उठले. ‘ अरे, आपण तर, सत्पात्र ब्राह्मण (मूळ अर्थ वेदमार्गाने जाणारा तो ब्राह्मण) शोधायला आलो होतो, पण हे तर, केवळ मुण्डण केलेले संन्यासी दिसतात. मग यांना शेष हविर्द्रव्य अर्पण करावे की नाही ? ठीक आहे. येथवर आलोच तर यांचे यांचे कुल कोणते ते विचारावे.

सुंदरिक त्यांना विचारता झाला, “ आपला जन्म कोणत्या कुलात झाला बरे ? ”

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

भगवान त्याला उत्तरतात, "सुंदरिका मी ब्राह्मण नाही की क्षत्रिय नाही. मी वैश्यही नाही, अशा लौकिक प्रकारात मी कुठेच बसत नाही. खरे तर, मी लोभ, मोह यांचा त्याग करून, प्रज्ञापूर्वक वावरणारा संन्यासी आहे. मी गृहरहित अलिप्तवृत्तीचा, शांतचित्ताचा, सत्य-धर्माचा उपदेशक आहे.

"हे सुंदरिका मी तुला प्रतिज्ञापूर्वक सांगतो की यज्ञात हविर्भाग अर्पण केल्यानंतर शिल्लक राहणारे पदार्थ एखाद्या शांत, वेद जाणणाऱ्या आणि दुःख व वासनांच्या पलीकडे गेलेल्या पुरुषाला दान म्हणून दिले जातील तरच तो यज्ञ सफल होईल."

भगवान बुद्धांचे ते अंतःकरण प्रसन्न, करणारे शब्द, त्यांची ती प्रशांत मुद्रा, दयापूर्ण कृपादृष्टी यांचा ज्याच्यावर वर्षाव झाला आहे, असा तो सुंदरिक एकदम आनंदित झाला. त्याच्या साऱ्या शंका निकाली निघाल्या. त्यामुळे भावनापूर्ण शब्दात तो म्हणाला, "भगवन् असे जर आहे, तर मग माझा यज्ञ सफल झालाच. आपल्या-सारख्या वेदज्ञांची भेट होणे हे मोठे भाग्याचे लक्षण आहे. माझे भाग्य थोर म्हणूनच हे घडले. आपल्यासारख्यांची भेट न झाल्यानेच आम्हाला इतरांना हा हविर्भाग अर्पण करावा लागतो."

(–सुंदरिक भारद्वाज सुत्त–सुत्तनिपात)

* * *

'पंचसाधन' ला आमच्या हार्दिक शुभेच्छा

मे. अजित ट्रेडिंग कं.,

कागद विक्रेते,

हरिनिवास

२२ जगन्नाथ प्लॉट

राजकोट – ३६० ००१

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

दोन क्षण

— एस. के.

संध्याकाळी
आणि
सकाळी
असे
दिवसाकाठी
दोन
क्षण
असे
येतात
की,
त्यावेळी
केवळ
आनंदच
आनंद
असतो. ॥ १ ॥

त्या
आनंदासाठी
रोजच
सुखाने
बारा-बारा
तास
कष्ट
केले
जातात,
अर्थात
त्या
कष्टांना
सामर्थ्यही
मिळते
त्याच
क्षणातून. ॥ २ ॥

त्या
क्षणांची
बरोबरी
चोवीस
तासातील
इतर
क्षण
करू
शकत
नाहीत.

क्षणासारखे
क्षण
असूनही
त्यांना
काही
तसा
अर्थ
नसतो.
त्यांना
तो
वकूब
नसतो.
सायं-प्रातर् ॥ ३ ॥

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

बरोबर
सूर्यास्त
आणि
बरोबर
सूर्योदय
हेच
मात्र
ठीक
दोन
क्षण. ॥ ४ ॥

लक्ष
देऊन
सावधान
राहून
साधावेत
असे. ॥ ५ ॥

तन्मय
होऊन
लक्षात
ठेवावेत
असेही.
जीवनाची
सारी
धडपड
आणि
जीवनाचा
सारा
अर्थ,
सार्थ
करण्याची
कुवत
त्याच
क्षणात
असते. ॥ ६ ॥

यात
नवल
काहीच
नाही. ॥ ७ ॥

तिथून
खरे
तर,
जीवनाची
सुरवात
होते,
तिथून
खरे
तर,
मानवाचे
उन्नयन
सुरू
होते.
मानवाला
मानवता
समजत
नराची
नारायणाकडे

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

वाटचाल
सुरु
होते. ॥ ८ ॥

आपण
बाल,
तरूण,
वृद्ध,
कसेही
असा.
त्या
दोन
क्षणांचा
आधार
घेऊन,
त्यावेळी
अग्निउपासना
करून,
जीवन
सफल
करा.
श्रुतींचा
हाच
संदेश;
हाच
आदेश;
हाच
उपदेश;
हाच
सत्यधर्म. ॥ ९ ॥

' पंचसाधन ' ला आमचे हितचिंतन !

मे. कोहिनूर एजन्सीज

कागद विक्रेते,

७१५, नारायण पेठ,

लक्ष्मी रोड,

पुणे – ४११ ०३०.

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

संपादक : एस्. के. कुलकर्णी.

प्रकाशक, मुद्रक : श्रीकांत राजीमवाले, ११८३ शिवाजीनगर, पुणे ४११००५.

प्रकाशनस्थळ : ११८३ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

मुद्रणस्थळ : पेपको प्रेस, पुणे २.

वार्षिक वर्गणी : रु. १०/-

[यातील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत.]

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri

Regd. No. PNC 254

ज्या दिवशी परमसद्गुरु श्रीगजाननमहाराज यांनी श्रुतींच्या पुनरुज्जीवनाची महान् प्रतिज्ञा केली, त्याच दिवशी धर्मादेशद्वारा कार्याची दिशा व्यक्त केली.

सप्तश्लोकी

(धर्मादेश)

यदा सृष्टं जगत्सर्वं तदा लोकपितामहः ।
चतुर्वेदसमायुक्तं शाश्वतं धर्ममादिशत् ॥ १ ॥

किं सत्कर्म किमध्यात्मं यदि विज्ञातुमर्हति ।
सर्वशास्त्रेषु ग्रन्थेषु प्रमाणं परमं श्रुतिः ॥ २ ॥

अस्पष्टं च कदा स्पष्टं तत्त्वज्ञानविवेचनम् ।
अन्यत्र लभ्यते किंतु प्रमाणं परमं श्रुतिः ॥ ३ ॥

आर्षग्रन्थेषु सर्वेषु श्रुतिप्रामाण्यमेव च ।
सर्वतः सारमादद्यान्निजकल्याणहेतवे ॥ ४ ॥

शुष्कवादरताः केचिन्नान्यदस्तीतिवादिनः ।
सर्वे ते विलयं यान्ति मिथ्याकलहकारिणः ॥ ५ ॥

नास्तिका वेदनिन्दकाः पाखण्डा वेददूषकाः ।
एते सर्वे विनश्यन्ति मिथ्याचारप्रवर्तकाः ॥ ६ ॥

यज्ञदानतपःकर्मस्वाध्यायनिरतो भवेत् ।
एष एव हि श्रुत्युक्तः सत्यधर्मः सनातनः ॥ ७ ॥

अग्निहोत्र आजच सुरू करा, त्याला पर्याय नाही.

CC-0. Sri Radha Krishna Samsthan, Delhi. Digitized by eGangotri